# प्रेसनोट

दि.२३.२.२०२१

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी**
**महिलांचे गळयातील मंगळसूत्र हिसकावणा-या दोन सराईत इराणी आरोपी अटक करून, १२,६५,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, १७ गुन्हे उघडकीस आणले.**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चेन चोरी व वाहन चोरी घडत असल्याने मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, यांनी चोरीचे घटनांचा आढावा घेवुन, गुन्हे शाखेकडील आधिकारी व अंमलदार यांना चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणणेबाबत दिलेल्या आदेशा प्रमाणे, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांनी पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील व शाकीर जिनेडी यांची ०२ पथके तयार करुन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयातील उघडकीस न आलेले चेन स्नॅचिंग गुन्हयांचा आढावा घेवुन, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत असताना, पोलीस अंमलदार आशिक बोटके, निशांत काळे व प्रदीप गोडांबे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चेन चोरी करणारे दोन इसम एका काळ्या रंगाचे नंबर नसलेल्या आपाची मोटार सायकलवरुन देहुफाटया कडुन मोशीचे दिशेने येत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, डुडुळगाव येथे सापळा रचुन इसम नामे १)सफिर फिरोज खान वय-३५ वर्षे रा. दत्तवाडी, सिंहगड कॉलेजरोड, लोणावळा पुणे २) मोहम्मद उर्फ डॉन शाबुद्दीन इराणी वय-२५ वर्षे रा. म.गांधी झोप.शिवाजीनगर, पुणे यांना काळया रंगाचे आपाची मोटार सायकलसह ताब्यात घेवुन, चौकशी करुन, त्यांना वाकड पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ३५/२०२१ भादवि कलम ३९२, ३४ या गुन्हयाचे कामी दिनांक ०५/०२/२०२१ रोजी १९:१५ वा.अटक करुन त्यांची पोलीस कोठडीची रिमांड घेण्यात आली.

पोलीस तपासामध्ये दोन्ही आरोपी व त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी मोहसीन लालु जाफरी रा.रायसेन मध्यप्रदेश हे चोरलेल्या वाहनांचा महिलांचे गळयातील चेन स्नॅचिंग गुन्हया करीता वापर करीत होते. त्यांचकडुन चेन स्नॅचिंग गुन्हयातील ११,०००,००/-रु. किंमतीचे २२० ग्रॅम सोन्याचे दागिने व १,६५,०००/-रु. किंमतीचे २ दुचाकी वाहने असा एकुण १२,६५,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, त्यामध्ये वाकड, सांगवी व देहुरोड पोलीस स्टेशन कडील प्रत्येकी -०३, चिंचवड पो.स्टे. कडील - ०२, चिखली, एमआयडीसी भोसरी, दिघी, तळेगाव दाभाडे, चाकण तसेच गंगाखेड (परभणी) पोलीस स्टेशन कडील प्रत्येकी - ०१ असे **चेन चोरीचे १४ गुन्हे, पोलीस बतावणी ०१ गुन्हा व वाहन चोरीचे ०२ गुन्हे एकुण १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.** आरोपी सफिर फिरोज खान हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द पुणे शहर, पुणे ग्रामीण येथे दरोडा व जबरी चोरीचे २२ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी मोहम्मद उर्फ डॉन शाबुद्दीन

इराणी याचे विरुध्द पुणे शहर, पुणे ग्रामीण येथे जबरी चोरी व वाहन चोरीचे ०९ गुन्हे दाखल आहेत

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त,श्रीमती प्रेरणा कट्टे, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, पोलीस उप- निरीक्षक महेंद्र पाटील व शाकीर जिनेडी तसेच पोलीस अंमलदार अशोक दुधवणे, गणेश हजारे, निशांत काळे, आशिष बोटके, प्रदीप गोडांबे, किरण काटकर, सुधीर डोळस, सुनिल कानगुडे, शकुर तांबोळी, गणेश गिरीगोसावी, विजय नलगे, संदीप पाटील, शैलेश मगर, आशोक गारगोटे, प्रदीप गुट्टे, तांत्रिक विश्लेषण विभागातील राजेंद्र शेट्टे, नागेश माळी व वाकड पोलीस स्टेशनचे जावेद पठाण यांचे पथकाने केली आहे.

